SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/13-14/ DATE : 10-Feb-15 6:58:29 PM

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था,

विषय :- **एन.सी.सी. उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुणांचा लाभ देण्याबाबतची स्पष्टता**

महोदय/महोदया,

वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, ब-याच महाविद्यालयांमधून **एन.सी.सी. उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुणांचा लाभ देण्याबाबतची स्पष्टता विचारणा करण्यात येत होती.** प्रथम वर्षाच्या परीक्षेचे नियोजन महाविद्यालयांकडे सोपविण्यात आल्यानंतर शा. शिक्षण ही १० गुणांची परीक्षाही संबंधित महाविद्यालयांकडे सोपविण्यात आली. त्यावेळी एनसीसीच्या गुणांबाबत स्पष्टता न झाल्यामुळे महाविद्यालयांकडून अशी विचारणा होत होती.

याअनुषंगाने परीक्षा मंडळाच्या बैठकीत खालीलप्रमाणे स्पष्टता महाविद्यालयांना कळविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठात प्रथम वर्षासाठी १० गुणांची शारीरिक शिक्षण ही योजना सुरू असून ती परीक्षा दुस-या सत्रात म्हणजेच मार्चमध्ये होणा-या परीक्षेवेळी महाविद्यालयात आयोजित करण्यात येते व त्याचा लाभ संबंधित विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष परीक्षेच्या दोन्ही सत्रातील कमी पडणा-या चार विषयाच्या गुणांच्या कमतरतेसाठी देण्यात येतो. या योजनेप्रमाणेच १० गुणांचा लाभ एनसीसी उपक्रमात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांनाही देण्यात येईल.

- प्रथम वर्ष परीक्षांचे नियोजन महाविद्यालयांकडे सोपविण्यापूर्वी एन.सी.सी. उपक्रमात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांचे गुण महाविद्यालयांकडून जिल्हा एनसीसी कार्यालयामार्फत येत होते.
- एनसीसी उपक्रमात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना शा. शिक्षण परीक्षेच्या १० गुणांप्रमाणे लाभ देण्यात येईल. प्रथम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन महाविद्यालयांकडे असल्यामुळे १० गुणांच्या शा. शिक्षण परीक्षेचे नियोजनही महाविद्यालयीन पातळीवर दुस-या सत्रात करण्यात येते व त्याचे गुण प्रणालीद्वारे भरण्यात येतात. त्याच पध्दतीने एनसीसीच्या सहभागींची १० गुणांची चाचणी महाविद्यालयातून आयोजित करण्यात यावी. या चाचणीसाठी शा. शिक्षण परीक्षेप्रमाणेच अन्य महाविद्यालयातून परीक्षक (एनसीसी ऑफिसर) निमंत्रित करण्यात यावेत. १० गुणांच्या चाचणीचे गुण प्रणालीमध्ये भरावेत. त्याची प्रिंट काढून ती महाविद्यालयाच्या रेकॉर्डमध्ये ठेवावी. सदर १० गुणांचा लाभ शा. शिक्षण चाचणी गुणांप्रमाणेच प्रथम वर्षाच्या चार विषयांच्या गुणांच्या कमतरतेसाठी दुस-या सत्राच्या निकालावेळी दोन्ही सत्रांचा एकत्रित निकाल जाहीर करताना देण्यात येईल.

......२

Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/13-14/ DATE : 10-Feb-15 6:58:29 PM



प्रणालीद्वारे गुण भरण्यासाठी महाविद्यालयाच्या suk.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरून महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करावी. परीक्षकांचे मानधन व अन्य बाबी प्रथम वर्षाच्या १० गुणाच्या शा. शिक्षण परीक्षेप्रमाणेच राहील.

- Post Examination
  ↓
- Assessment Data Entry
  ↓
- Data Entry
  ↓
- ECA Mark Entry

याप्रमाणे कार्यवाहीसाठी सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. तसेच विद्यार्थ्यांच्या माहितीसाठ नोटीसबोर्डवरही सूचना लावण्यात याव्यात ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(श्री. महेश काकडे)
परीक्षा नियंत्रक

प्रत :-

१. सर्व परीक्षा विभागप्रमुख व उपकुलसचिव, सहा. कुलसचिव यांना माहितीसाठी